# योग प्रशिक्षकासाठी सुचना

भरती प्रकियेतील पुढील टप्पे खालील प्रमाणे-

- सर्व पात्र उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणी, मुलाखत व प्रात्याक्षिकासाठी दि.०४/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशिय सभागृह जिल्हा परिषद सातारा च्या मोकळया जागेत उपस्थित रहावे.
- योग प्रशिक्षकांनी मुलाखत / प्रात्याक्षिक दरम्यान भरलेला ऑनलाईन फॉर्मची एक प्रत व योगप्रशिक्षणासंबंधी मुळ कागदपत्रे (Degree, Diploma, Certificate Course, Govt. Experience Certificate) सादर करावयाची आहे. मुळ कागदपत्र सादर न केल्यास भरती प्रक्रियेतुन आपणास कोणत्याही टप्यावर अपात्र करण्यात येईल.
- प्रात्यक्षिकाकरीता Provisional Merit List मधील पात्र उमेदवारांनी स्वत:चे योगा मॅट घेऊन यावयाचे आहे.
- वरील सर्व प्रक्रियेनंतर प्रात्यक्षिक व मुलाखतीचे गुण नमुद करुन अंतिम Merit यादी जाहिर करणेत येईल.
- जाहिरातीनुसार रिक्त असलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रावर व अंतिम यादीनुसार उमेदवारांना मेरिटप्रमाणे समुपदेशना करिता बोलविले जाईल. समुपदेशनामध्ये गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना रिक्त असणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देणेत येतील. जे उमेदवार नियुक्तीसाठी इच्छुक नसतील त्यांचा नकार गृहीत धरुन तात्काळ नकारपत्र भरुन घेणेत येईल. त्यामुळे उमेदवारांने विचारांती निर्णय घ्यावा.
- समुपदेशनपश्चात देणेत आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रानुसार कंत्राटी नियुक्ती आदेश देणेत येतील.
- कंत्राटी नियुक्ती आदेश दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही प्रकारे नियुक्तीचे ठिकाण बदलुन दिले जाणार नाही. त्यामुळे समुपदेशनाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती ठिकाण बदलणेसाठी या कार्यालयास पत्र व्यवहार/विनंतीअर्ज /पदाधिकारी यांचेमार्फत शिफारस करु नये.
- नियुक्ती आदेशापश्चात ३ दिवसाच्या आत दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे व तसा हजर अहवाल तालुका कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयास ई मेलव्दारे पाठविणेचा आहे.
- आपण नियुक्ती आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत हजर न झाल्यास आपण सदर पदावर काम करण्यास इच्छुक नसून आपली जिल्हा कार्यालयाकडे या बाबतची कोणतीही भविष्यात तक्रार असणार नाही व नियमाप्रमाणे प्रतिक्षायादी मधील असणाऱ्या उमेदवारांना पुढील नियुक्ती आदेश दिले जातील.

| | |
|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>जिल्हा परिषद सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा |

Scanned with CamScanner